दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९६ वा रविवार दि.१५ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## लातूर जिल्हा रुग्णालयाचा रखडलेला प्रश्न मार्गी लावावा...

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे



लातूर : धाराशिव जिल्ह्यात नियोजित विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लातूर विमानतळावर उतरले असता त्यांचे स्वागत जिल्हाधिकारी यांनी केले. जेवढा वेळ ते विमानतळावर होते त्या वेळेत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्हा रुग्णालय या महत्वाच्या आणि रखडलेल्या विषयाची सविस्तर माहिती देत त्यांना रुग्णालय संदर्भात माझं लातूर परिवार आणि सर्वसामान्य नागरीकांच्या तीव्र भावना अवगत करून दिल्या. गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेला लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न माझं लातूर परिवाराने केलेले बेमुदत साखळी उपोषण आणि सततच्या पाठपुराव्यामुळे आता ऐरणीवर आला आहे. १ ऑक्टोबर २००८ रोजी जिल्हा रुग्णालयाची इमारत उपलब्ध मनुष्यबळासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास वर्ग करण्यात आली होती. २०१२ साली राज्यशासनाने लातूर जिल्हा रुग्णालयास मान्यता देऊन बांधकामासाठी १२० कोटी रुपयांची तरतूद देखील केली होती. मात्र जागा उपलब्ध होत नसल्याने हा विषय जवळजवळ ७ वर्ष रखडला. १९ जुलै २०१९ रोजी परभणी कृषी विद्यापठांतर्गत लातूर कृषी महाविद्यालय येथील सर्व्हे नं. ३७ मधील १० एकर जमीन रुग्णालयासाठी देण्याचा निर्णय शासनाने घेतला. भूसंपादनापोटी २ कोटी ८२ लाख रुपये आरोग्य विभागाने कृषी विभागास द्यावे असा निर्णय झाला. लालफितीत अडकलेल्या लातूर जिल्हा रुग्णालय विषयास माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोबर २०२३ रोजी बेमुदत साखळी उपोषण सुरू करून पुन्हा ऐरणीवर आणले. एवढ्यावर न थांबता माझं लातूरने मंत्रालय गाठत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालकमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले आणि हा विषय मार्गी लावावा अशी आगृही विनंती केली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जागेचे पुनर्मूल्यांकन करण्यात आले आणि ही रक्कम ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये इतकी झाली. ज्या ज्या वेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री लातूर येथे आले त्या वेळी हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी प्रयत्न केले. अखेर १९ जून २०२४ रोजी निघालेल्या शासन आदेशात जमीन हस्तांतरण निधी वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आणि ६० दिवसांच्या आत जमीन हस्तांतरण करून घेण्याचे आदेश दिले. १९ ऑगस्ट २०२४ रोजी ही मुदत संपली तरीही प्रश्न आजतागायत रखडला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या महत्वाच्या प्रलंबित विषयास त्वरित मार्गी लावावा अशी विनंती केली आहे. याबाबत येत असलेल्या तांत्रिक अडचणीबाबत त्यांना अवगत करून दिले आहे. येत्या काही दिवसात हा प्रश्न निकाली लागेल अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरीकांतून व्यक्त केली जात आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लातूर विमानतळावर स्वागत



लातूर :- धाराशिव जिल्ह्यातील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त पंजाबराव खानसोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध पदाधिकारी यावेळी उपस्थिती होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचे लातूर विमानतळ येथून हेलिकॉप्टरने धाराशिव जिल्ह्यातील परांडाकडे प्रयाण केले. परांडा येथे होत असलेल्या मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रम आणि धाराशिव येथील शिवसेना पक्षाच्या मेळाव्याला उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ४.१५ वाजता मुख्यमंत्री यांचे लातूर विमानतळ येथे आगमन होईल व विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

## लातूर मार्केट कमिटीचा नावलौकिक राज्यात निर्माण करण्याचे काम केले -कव्हेकर



लातूर- बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी, हमाल, गाडीवान व मापाडी यांचा चौफेर विकास करण्याचे काम करू. १९८७ साली सभापती पदावर असताना बाजार समितीमध्ये ललीतभाई शहा अरविंद सोनवणे या सहकार्यांसोबत काम करताना शेतकर्यांच्या पाल्यांसाठी २०० मुलांचे वसतिगृह उभारण्याचे काम केले. हमाल, मापाड्यांसाठी १०० लोकांची गृहनिर्माण सोसायटी उभारून त्यांना हक्काचे घर देण्याचे काम केले. याबरोबरच मार्केट यार्डातील ६५०० हमाल, गाडीवान व मापाड्यांसाठी माथाडी बोर्ड लागू केले. आज त्यांच्या खात्यावर १०० कोटींचा निधी जमा आहे. त्यामुळे लातूर बाजार समितीचा नावलौकिक महाराष्ट्रात निर्माण झाला. त्यामुळे यापुढील कालावधीतही विकासाच्या प्रवाहात राहण्यासाठी भाजपाच्या पाठीशी उभे रहा, मुंबई पुण्यानंतर लातूर मार्केट कमिटीचा नावलौकिक पुन्हा राज्यात वाढविण्याचे काम करू असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.यावेळी ते आपलं लातूर संवाद लातूरकरांशी या माध्यमातून आयोजित शिवछत्रपती मार्केट यार्डातील जनसंवाद पदयात्रेच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदासराव काळे, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार, भाजपा सरचिटणीस प्रविण सावंत, शिरीष कुलकर्णी, मंडलाध्यक्ष संजय गिर, बाबासाहेब कोरे, व्यापारी महासंघाचे अजय दुडिले, नंदकिशोर सोनी, नितीन कोरे, महिला आघाडीच्या माजी शहर जिल्हाध्यक्ष मिनाताई भोसले, दिनकर पाटील मसलगेकर, बाबासाहेब देशमुख, आदमाने ताई, विष्णूजी भूतडा, बालाजी शेळके, बालाजी जाधव, गोवर्धनदास भंडारी, पृथ्वीराज पाटील, नवनाथ माने, जाजू शेठ, उध्दवराव जाधव, संतोष जाधव,ॲड. गणेश गोजमगुंडे, संतोष तिवारी,आकाश बजाज, शशिकांत हांडे, सागर घोडके,आफ्रिन खान, बाळू शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १४० कोटी जनतेच्या आशीर्वादावर तिसर्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेऊन भारतीय राज्यघटनेचा सन्मान करण्याचे काम केले. काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत भाजपा सरकारवर घटना बदल करणार असा खोटा आरोप केला होता. परंतु खर्या राज्यघटनेला बदलण्याचे काम काँग्रेसने केलेले आहे. १९७५ मध्ये इंदिरा गांधीनी आणिबाणी जाहीर करून अनेकांना अटक करण्याचे काम केलेले आहे.

## महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित?

मुंबई : आगामी विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. त्यातच आता राज्यातील सर्वच पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर सध्या सर्वच पक्षांकडून जागावाटप, मतदारसंघाची चाचपणी केली जात आहे. त्यातच आता महाविकासआघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे.
लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकासआघाडी जागावाटपाचा फॉर्म्युला काय असणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. गणेशोत्सवानंतर जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित करण्यासाठी मॅरेथॉन बैठक घेतली जाईल. यानुसार विधानसभेच्या २८८ जागांपैकी १०५ जागांची मागणी काँग्रेसने केली आहे. शिवसेना ठाकरे गटाने १०० जागा मागितल्या आहेत. तर शरद पवार गटाने ९० जागांची मागणी केली आहे.
सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाविकासआघाडीत सध्या जागावाटपाबद्दल सातत्याने चर्चा होत आहे. यानुसार काँग्रेसने १०० ते १०५ जागांवर लढण्याची तयारी केली आहे. तर शरद पवार गटाने ८५ ते ९० जागांवर लढण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासोबतच ठाकरे गटाने ९५ ते १०० जागांवर लढण्याचा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सवानंतर महाविकासआघाडीच्या अनेक बैठका होताना दिसणार आहेत. या सर्व बैठका पितृपक्षात होतील. त्यानंतर नवरात्रीपूर्वी किंवा नवरात्रीदरम्यान जागावाटपाबद्दल अंतिम निर्णय जाहीर केला जाईल.
त्यासोबत काँग्रेस आणि ठाकरे गटात मुख्यमंत्रिपदावरून सध्या रस्सीखेच सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे नेते मुख्यमंत्रिपदाबद्दल विविध विधाने करताना दिसत आहेत. तर दुसरीकडे ठाकरे गटही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण हे लवकर जाहीर करावा असे सांगत आहेत. त्यामुळे याच बैठकांमध्ये मुख्यमंत्रिपदाबद्दलही अंतिम निर्णय घेतला जाईल, असे बोलले जात आहे.
पवार गटाचा लोकसभेचा फॉर्म्युला कायम
लोकसभेत पवार गटाने १० जागांवर निवडणूक लढवली होती. यातील ८ जागांवर त्यांना विजय मिळाला होता. त्यानुसार येत्या विधानसभा निवडणुकीतही पवार गटाचा हाच फॉर्म्युला कायम राहणार असल्याचे बोलले जात आहे. शरद पवार येत्या विधानसभेला नवीन चेह-यांना संधी देणार आहेत. त्यामुळे येत्या निवडणुकीत पवार गटाचे ५० हून अधिक आमदार जिंकून येऊ शकतात, असे बोलले जात आहे.

## ईदची सुटी १६ ऐवजी १८ सप्टेंबर रोजी

मुंबई : प्रतिनिधी-सोमवारची ईद-ए-मिलादची शासकीय सुटी रद्द करून बुधवार, १८ सप्टेंबर रोजी देण्यात येणार आहे. ईद मिलाद मुस्लिम धर्मीयांचा सण असून मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणामध्ये साजरा करतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मंगळवार, १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थी म्हणजेच गणपती विसर्जन असल्याने दोन्ही समाजामध्ये शांतता आणि सामाजिक सलोखा कायम राहण्याकरिता या सुटीमध्ये बदल करण्यात आलेला आहे. याविषयी शासकीय परिपत्रक काढण्यात आले आहे.राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्यांमध्ये ईद-ए-मिलाद या सणाची सुटी सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी देण्यात आली होती. मात्र आता या सुटीत बदल करण्यात आला आहे. ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मीयांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.मंगळवार, दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण असल्याने दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने यावर्षी मुंबई शहर, मुंबई उपनगर व इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मियांनी बुधवार, दि. १८ सप्टेंबर २०२४ रोजी जुलूस काढण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर या क्षेत्रामध्ये सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४ करिता घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुटी रद्द करून ती आता बुधवार, दि. १८ सप्टेंबर २०२४ या दिवशी जाहीर करण्यात येत आहे.मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांव्यतिरिक्त राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी यांनी मुस्लिम धर्मियांकडून काढण्यात येणा-या मिरवणुकीचा दिनांक विचारात घेऊन सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी जाहीर केलेली सार्वजनिक सुटी कायम ठेवावी किंवा ती रद्द करून बुधवार, दि. १८ सप्टेंबर २०२४ रोजी सार्वजनिक सुटी जाहीर करावी याबाबत संबंधित जिल्हाधिका-यांनी निर्णय घ्यावा, असा आदेश शासनाने काढला आहे.




## संपादकीय....

### वीणा सहस्रबुद्धे

ज्यांच्या नावात वीणा आणि बुद्धी आहे अशा गायिका, अध्यापिका, बंदिशकार व संगीतकार वीणा सहस्रबुद्धे यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म कानपूर येथे १४ सप्टेंबर १९४८ रोजी झाला. मूळच्या ग्वाल्हेर घराण्याच्या गायिका असलेल्या वीणा किराणा आणि जयपूर घराण्याच्या गायकीतील प्रकारही उत्तमपणे सादर करीत. रागसंगीताचा प्रचंड व्यासंग असलेल्या गायिका म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांचे वडील शंकरराव बोडस हे पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे शिष्य होते.

वर्ष १९४८ मध्ये शंकररावांनी आणि पं. लालमणी मिश्र यांनी कानपूरमध्ये गांधी संगीत विद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या मातोश्री शांताबाई कानपुरात संगीत शिकवत. वीणा यांच्या संगीताचे सुरुवातीचे शिक्षण वडिलांकडे व मोठे बंधू काशिनाथांकडे झाले तसेच पं. भगवंतराय भट्ट, पं. वसंत ठकार व पं. गजाननराव जोशी यांचेही मार्गदर्शन त्यांना मिळाले. त्याबरोबर त्यांनी कथ्थक नृत्याचेही काही दिवस प्रशिक्षण घेतले. त्या सतारही वाजवीत असत. वीणा यांनी १९६८ मध्ये कानपूर विद्यापीठातून संगीत, संस्कृत साहित्य व इंग्लिश साहित्य या विषयांत पदवी घेतली. १९६८ मधे त्यांचा विवाह संगणक क्षेत्रातील नामवंत हरी सहस्रबुद्धे यांच्याशी झाला. वर्ष १९६९ मध्ये त्यांनी संगीतालंकार ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केली.

त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेले संगीत विद्यालय वीणा यांनी १६ वर्षे चालविले. कानपूरमध्ये अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी संगीताची तालीम दिली. याच कालावधीत आकाशवाणीवरही त्यांचे संगीताचे कार्यक्रम होत असत. वर्ष १९७९ मध्ये दोन वर्षासाठी त्या परदेश दौर्‍यावर गेल्या. कोपनहेगनमधील संगीतोत्सवासाठी त्यांना खास निमंत्रण होते. स्टॉकहोम (स्वीडन) येथील कंठसंगीताच्या समारोहातील चर्चासत्रात त्यांनी सहभाग घेतला.

कोपनहेगन (डेन्मार्क) येथील 'व्हॉइसेस ऑफ दी वर्ल्ड' या संगीत समारोहात त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताची प्रतिनिधी म्हणून सादरीकरण केले. देश-विदेशातील विद्यार्थ्यांकरिता त्यांनी संगीताच्या कार्यशाळा व चर्चासत्रे घेतली. वीणा यांनी संगीतशास्त्रावर लेखनही केले. 'नादनिनाद' हे त्यांच्या व त्यांच्या परिवारातील संगीत जाणकारांच्या बंदिशींचा समावेश असलेले पुस्तक. विविध नामवंत निर्मिती संस्थांनी त्यांच्या गायनाच्या सुमारे ५० सीडी प्रकाशित केल्या आहेत. त्यांमधे ख्याल, तराणा, ऋतुसंगीत, भजन इत्यादी संगीतप्रकारांचा समावेश आहे.

वर्ष १९८४ मध्ये वीणा यांचे कुटुंब पुण्यात स्थायिक झाले. एसएनडीटी महाविद्यालयात त्यांनी संगीत-अध्यापक व शेवटची दोन वर्षे संगीत शाखेच्या विभागप्रमुख म्हणून कार्य केले. या काळात त्यांनी संगीतातील तराण्यावर विशेष संशोधन करून 'संगीत प्रवीण' ही डॉक्टरेट पदवी संपादन केली. आयआयटी मुंबई येथे अभ्यागत साहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांनी संगीताचे अध्यापन केले तसेच कानपूर आयआयटीमध्येही त्या संगीत अध्यापक म्हणून कार्यरत होत्या.उत्तर प्रदेश संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार, राष्ट्रीय संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळाले. डिसेंबर २०१२ मध्ये त्यांची अखेरची सार्वजनिक मैफल झाली. पुण्यात त्यांचे निधन झाले. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाने त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना 'महामहोपाध्याय' या पदवीने गौरविले.

# धर्मानुसार वर्तनाला कायद्याची परवानगी, पण म्हणून वाट्टेल ते खपवून घेतले जाणार नाही!

भारतीय संकल्पनेनुसार 'धर्म' म्हणजे केवळ कायदे कानून किंवा 'हे करा- ते करू नका' असे असत नाही. हिन्दूधर्माचे कोणतेही एक असे संविधान नाही, संहिता नाही. 'धर्म' भू-राजकीय, सामाजिक आचारांची नैतिक व न्यायाधिष्ठित एक सामाजिक व्यवस्था निर्धारित करतो. तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।।(भगवद्गीता १६.२४). त्यामधून अनेकांच्या हिताचा, सुखाचा, अभ्युदयाचा विचार अंतर्भूत असतो, तसेच व्यक्तिस्वातंत्र्यासह व्यक्तीचे कर्तव्य, दायित्व निर्दिशित केलेले असते. या अर्थाने धर्म असा शब्दप्रयोग अनेक ठिकाणी केला जातो, मनुष्यधर्म, राष्ट्रधर्म, पुत्रधर्म इत्यादी. त्या अर्थाने, भारतीय संविधानाला आपला 'राष्ट्रधर्म म्हणून त्यावर 'विश्वास' असतो. संविधानावरील विश्वासामागे त्यातील तर्काधिष्ठित विवेक, नैतिकता, न्यायाधिष्ठित व्यापक सामाजिक, राष्ट्रीय दृष्टिकोन आहे. म्हणून लोक न्यायालयाकडे विश्वासातूनच बघतात (येतात), श्रध्देतून नव्हे. अन्यायाच्या विरोधात वा नियम-कायदा मोडल्यास शिक्षेची निश्चिती असते, त्याला दैवाधीन सोडलेले नसते. येथे कायद्याचे राज्य आहे असा विश्वास असतो. संसदेला मंदिर म्हणणे, संविधानाला पवित्र म्हणणे हे लाक्षणिक अर्थाने समजावे. आपला अत्यंतिक आदरभाव, आस्था व्यक्त करताना यासारखे उल्लेख होत असतात. विशाषतः हिंदू धर्मीयांत ईश्वराला बाप, बंधू-सखा संबोधणे ही बाब सवयीची आहे. राष्ट्रवाद असा नैतिक म्हणून मानलेली मानवी मूल्ये जी कायद्याने सर्व घटकांना समान व बंधनकारक आहेत ती न पाळणाऱ्या वर्तनात सुधारणा करण्याचा अधिकार न्यायोचित म्हटला पाहिजे. कारण देशात शांतता, व्यवस्था सुरळीत राखण्याची जबाबदारी कायद्याची आहे. म्हणून संविधान व कायद्याच्या मर्यादांमधून धार्मिक व्यवहारांमध्ये सुधारणा होणे गैर नाही. इंग्रजांनी सर्वांसाठी समान फौजदारी कायदे केलेत तेव्हा मुस्लिमांनी आक्षेप घेतला नाही. अन्य स्थानिक पातळीवरील कायद्यांच्या सोबतही ते राहिले आहेत. मात्र वैयक्तिक कायदे धर्मागणिक निरनिराळे असावेत, हा आग्रह म्हणजे इंग्रजांच्या 'फोडा आणि झोडा' नीतीचे कटु फळ. मुस्लीम कायदा प्राचीन,



ग्रंथ' म्हणणे चुकीचे ठरणार नाही. सांविधानिक नियमनांना भू-राजकीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक संदर्भ असतात. भारत हे राष्ट्र धर्माधिष्ठित नाही परंतु भारतीय संविधानात सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानातील विचार समाविष्ट आहेत असे म्हणता येईल. जगातील लिखित राज्यघटनांपैकी ६६ राज्यघटनांची सुरुवात ईश्वरला स्मरून होत असली तरी भारतीय संविधानाचे तसे नाही. आपले भारतीय संविधान लोकशाही गणराज्य, न्याय, व्यक्तीस्वातंत्र्य, समता व बंधुता यांना संकल्पपूर्वक बांधील 'राष्ट्रधर्मा'ची संहिता आहे. सर्वोच्च न्यायालयाची स्थापना २८ जानेवारी १९५० रोजी झाली व (त्यापूर्वी) संविधान लागू झाले होते. न्यायव्यवस्था एकात्मिक स्वायत्त संस्था आहे. या न्यायपालिकेचे ब्रीदवाक्यच 'यतो धर्मस्ततो जयः' असे आहे. यातील धर्माचा अर्थ नैतिकतेचा विजय, अन्यायाविरुद्ध विजय असा आहे. महाभारतकाळात हिंदू, बौद्ध, शीख असे 'धर्म' काही नव्हते. त्यामुळे इथे 'धर्माचा' विजय म्हणजे नैतिकतेचा व न्यायोचिततेचा विजय असाच अथे आहे. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाचे 'यतो धर्मस्ततो जयः' हे ब्रीदवाक्य यथार्थ आहेच, कारण कायद्यालाही मानवी चेहरा असणे आवश्यक आहे. धर्मांतर्गत कायदे हे आदेश आवाहन असतात व त्यांचेमागे संस्कार असतात, ईश्वराचे अधिष्ठान असते म्हणून ते श्रद्धापूर्वक पाळले जातात. अन्यथा श्रध्दा व्यक्तिगत, भावनिक म्हणवल्या जातात. व्यक्तीपरत्वे भिन्न असतात. तसे न्यायालयीन कायद्याचे नसते. कायदा हा अविचल असतो स्वतंत्र धर्म नाही. भारतासारख्या बहुधार्मिक लोकशाही देशाचे संविधान कोणा एका धर्माच्या, एकाच समाजघटकाच्या हितांच्या रक्षणार्थ नाही वा उच्चाटनार्थही नाहीच नाही. भारतीय राज्यघटना जगातील अनेक काही घटनांप्रमाणे कुणा एका धार्मिक श्रद्धेला (धर्माला) प्राधान्य देणारी नाही. त्यामुळे धर्माप्रमाणे राष्ट्रीयत्वाच्या श्रद्धा भिन्न भिन्न असणार नाहीत. अर्थात, कायद्यांनुसार न्यायालयांत उभ्या राहणाऱ्या खटल्यांमध्ये, युक्तिवादांमध्ये अथवा न्यायाधीशांच्या निकालपत्रांतही प्रसंगोचित वेगवेगळ्या धर्मशास्त्रांचा, इतिहासाचा उल्लेख म्हणजे आधार घेतला जातो, देवदेवतांना पक्षकार म्हणून बनविले जाते. ज्या खटल्यांचे विषय धर्माशी निगडित असतात, ईश्वराशी निगडित असतात त्यांच्या बाबतीत धर्माचा, ईश्वराचा उल्लेख कामकाजातून कसा टाळता येईल? शाहबानो प्रकरणात इस्लामचा कायदा काय सांगतो, शबरीमला प्रकरणात धर्मशास्त्र काय सांगते हे उल्लेख अपरिहार्यच आहेत.

घटनेप्रमाणे धार्मिक स्वातंत्र्याला मर्यादाही आहेत. कायदा नैतिकता, व्यक्तींचे मूलभूत अधिकार यांचा कैवार घेतो व त्याला विरोधी म्हणून चालविल्या जाणाऱ्या वर्तनाला प्रतिबंध घालतो. यातून विद्यमान समाजाच्या भल्यासाठी, सर्व जाती, धर्म, लिंगांच्या व्यक्तींच्या भल्यासाठी धर्मिक म्हणून चालविल्या जाणाऱ्या अनिष्ट, संविधानविघातक वर्तनात सुधारणा करण्याची कायद्याची आवश्यकता अधोरेखित होते. धर्म सुधारणे हे न्यायालयचे काम निश्चितच नाही. परंतु सामाजिक न्याय, व्यक्तीचे मूलभूत अधिकार, अपरिवर्तनीय आहे असे नाही. धार्मिक वर्तनात सुधारणा संविधानाच्या आणि कायद्याच्या आधाराने व्हायला कुठलीही हरकत नसावी. धर्मानुसार वर्तनाला कायदा परवानगी देतो, पण म्हणून धर्माच्या नावाखाली वाटेल ते खपवून घेतले जात नाही. अपवादाने नियमबद्धतेतील कार्यकारण भाव सिद्ध होतो. अपवादात्मक घटनांना कायदेशीर धरता येणार नाही. 'रूढी' म्हणजे परंपरेने निश्चित कारणाशिवाय श्रद्धेतून केला जाणारा धार्मिक आचार. रूढी या धार्मिक कायद्यांचा भाग नसल्या, त्यांच्यावर न्यायालयीन कायदेशीर बंदी घालता येत नसली तरी त्यामाध्यमातून सामाजिक असुरक्षितता, स्वैराचार, अश्लाघ्य वर्तनावर कायदेशीर नियंत्रण आवश्यक आहे. अनेक रूढी आजही 'आवश्यक धार्मिक प्रथा' मानून त्या पाळल्या जातात पण त्यातील काही अन्यायकारक, अमानुष, कालबाह्य असू शकतात. त्यांच्या विरोधात जर एखाद्याने दाद मागितली तर न्यायालय धार्मिक ग्रंथांची चिकित्सा जरूर करेल व त्या 'आवश्यक धार्मिक प्रथा' कशा ठरतात याची शहानिशा करेल. व्यक्तीच्या अधिकारांना ज्या मानवी मूल्यांचा आधार असतो, ती सर्व मनुष्यांना समान असतात. अन्यायी, अविवेकी, माणूसपणाला लांछनास्पद असणाऱ्या प्रथांना तर कायद्याने पायबंद घालणे आवश्यकच आहे, हे सुशिक्षित, सुसंस्कृत समाज जाणतो. अमानुष, अत्याचारी पुरुषी अहंकारी कृत्यांचे धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली 'आवश्यक धार्मिक प्रथा' म्हणून समर्थन करणे, म्हणजे समाजाची मानसिकता मध्ययुगात ढकलणे ठरते.

# राष्ट्रीय एकात्मतेची भावना असली पाहिजे !

भारतीय संघराज्याच्या राजभाषेत १४ सप्टेंबर १९४९ रोजी घटना समितीने ऐतिहासिक निर्णय घेऊन हिंदी भाषेला राजभाषेचा सन्मान दिला. त्यामुळे दरवर्षी १४ सप्टेंबर हा दिवस 'हिंदी दिन' म्हणून साजरा केला जातो. राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये सध्या बावीस भाषांना राष्ट्रभाषा म्हणून दर्जा देण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या १७ व्या भागात जी कलमे नमूद आहेत, त्यानुसार हिंदी ही भारतीय संघराज्याची राजभाषा असून, तिची लिपी 'देवनागरी' असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. १४ सप्टेंबर पासून एक आठवडा 'हिंदी सप्ताह' साजरा केला जातो. या आठवड्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. हा कार्यक्रम शाळेत आणि कार्यालयात आयोजित केला जातो. केवळ हिंदी दिवसापुरते मर्यादित न राहता लोकांमध्ये हिंदी भाषेच्या विकासाची भावना वाढविणे हा त्याचा मूळ उद्देश आहे.

१९१८ मध्ये गांधीजींनी हिंदी साहित्य संमेलनात हिंदीला राजभाषा बनवण्याची मागणी केली होती. गांधीजींनी तिला जनमानसाची भाषाही म्हटले आहे. १९४९ मध्ये, स्वतंत्र भारताच्या अधिकृत भाषेच्या प्रश्नावर बराच विचारविनिमय केल्यानंतर, १४ सप्टेंबर १९४९ रोजी हा निर्णय घेण्यात आला, ज्याचे भारतीय राज्यघटनेच्या १७ व्या अध्यायामध्ये वर्णन केले आहे. संघाची अधिकृत भाषा हिंदी आणि लिपी देवनागरी असेल. संघाच्या अधिकृत हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या अंकांचे स्वरूप आंतरराष्ट्रीय स्वरूप असेल. हा निर्णय १४ सप्टेंबर रोजी घेण्यात आला, हा दिवस हिंदी साहित्यिक व्योहर राजेंद्र सिंह यांचा ५० वा वाढदिवस होता, म्हणूनच हा दिवस हिंदी दिवसासाठी सर्वोत्तम मानला जात होता. मात्र राष्ट्रभाषा म्हणून तिची निवड करून अमलात आणल्यावर अहिंदी भाषिक राज्यातील लोकांनी विरोध सुरू केला आणि इंग्रजीलाही राजभाषेचा दर्जा द्यावा लागला. त्यामुळे हिंदीवरही इंग्रजी भाषेचा प्रभाव पडू लागला.

वर्षातून एकदा लोकांना जाणीव करून देणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे की, जो पर्यंत ते हिंदीचा पूर्ण वापर करत नाहीत तो पर्यंत हिंदी भाषेचा विकास होऊ शकत नाही. या दिवशी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये इंग्रजी ऐवजी हिंदीचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो. याशिवाय जो वर्षभर हिंदीत चांगली विकासकामे करतो आणि आपल्या कामात हिंदीचा चांगला वापर करतो, त्याला पुरस्काराने गौरविण्यात येते. बरेच लोक त्यांच्या सामान्य बोलण्यात इंग्लिश भाषेतील शब्द किंवा इंग्रजी देखील वापरतात, ज्यामुळे हिंदीचे अस्तित्त्व हळूहळू धोक्यात येत आहे. दूरचित्रवाणी पासून शाळांपर्यंत आणि सोशल मीडियापासून खाजगी तांत्रिक संस्था आणि खाजगी कार्यालयांपर्यंत सर्वच गोष्टींवर इंग्रजीचे वर्चस्व कायम आहे. यावरून असे दिसते की, त्यांची मातृभाषा हिंदी हळूहळू कमी व्हावी आणि नंतर दशकांनंतर नामशेष होऊ नये. आपल्या मातृभाषेला आपल्या जीवनात लहानसहान प्रयत्नांनी आवश्यक स्थान दिले नाही तर ती इतर भाषांच्या स्पर्धेत खूप मागे पडेल. वाराणसी येथे असलेली जगातील सर्वात मोठी हिंदी संस्थाही आज अतिशय जीर्ण अवस्थेत आहे. या कारणास्तव या दिवशी सर्वांना विनंती आहे की त्यांनी फक्त त्यांच्या बोलल्या जाणाऱ्या भाषेत हिंदीचा वापर करावा.

याशिवाय लोकांना त्यांचे विचार वगैरे हिंदीत लिहिण्यास सांगितले जाते. हिंदी भाषेत लिहिण्याची साधने फार कमी लोकांना माहिती असल्याने या दिवशी हिंदी भाषेतील लेखन, तपासणे आणि शब्दकोश याबद्दल माहिती दिली जाते. हिंदी भाषेच्या विकासासाठी काही लोकांनी काम केल्याने फारसा फायदा होणार नाही. त्यासाठी सर्वांना संघटित होऊन हिंदीच्या विकासाला एका नव्या वळणावर घेऊन जावे लागेल. हिंदी भाषेच्या विकासासाठी आणि ती नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी हे आवश्यक आहे. हिंदी दिवसात अनेक कार्यक्रम होतात. या दिवशी विद्यार्थ्यांना हिंदीचा आदर करण्यास आणि दैनंदिन व्यवहारात हिंदीचा वापर करण्यास शिकवले जाते. ज्यामध्ये हिंदी निबंध लेखन, वादविवाद, हिंदी टंकलेखन स्पर्धा इ. हिंदी दिनानिमित्त लोकांना हिंदीसाठी प्रेरित करण्यासाठी भाषा सन्मान सुरू करण्यात आला आहे. हिंदी भाषेचा लोकांमध्ये वापर आणि उन्नतीसाठी विशेष योगदान देणाऱ्या देशातील अशा व्यक्तिमत्त्वाला दरवर्षी हा सन्मान देण्यात येणार आहे. यासाठी एक लाख एक हजार रुपये मानधन म्हणून दिले जाते. हिंदी भाषेतील निबंध लेखन स्पर्धेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी हिंदी भाषेच्या विकासासाठी आणि विस्तारासाठी अनेक सूचनाही प्राप्त होत आहेत. पण दुसऱ्या दिवशी सर्वजण हिंदी भाषा विसरतात. आणखी काही दिवस हिंदी भाषा लक्षात ठेवा, यासाठी राष्ट्रीय भाषा सप्ताह सुध्दा आयोजित करण्यात येतो. त्यामुळे ते वर्षातून किमान आठवडाभर राहते.

भाषिकांच्या संख्येनुसार इंग्रजी आणि चिनी भाषांनंतर हिंदी ही जगातील तिसरी मोठी भाषा आहे. पण नीट समजणाऱ्या, वाचणाऱ्या आणि लिहिणाऱ्यांमध्ये ही संख्या फार कमी आहे आणि ती कमी होत चालली आहे. यासोबतच इंग्रजी शब्दांचाही हिंदी भाषेवर मोठा प्रभाव पडला असून अनेक शब्द प्रचलित होऊन त्यांची जागा इंग्रजी शब्दांनी घेतली आहे. त्यामुळे भविष्यात ही भाषा नामशेष होण्याची शक्यताही वाढली आहे. या कारणास्तव ज्यांना हिंदीचे ज्ञान आहे किंवा हिंदी भाषा जाणते, अशा लोकांना त्यांच्या हिंदीबद्दलच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो, जेणेकरून ते सर्व त्यांचे कर्तव्य पार पाडू शकतील आणि हिंदी भाषेचे भविष्य घडवू शकतील. ते विलुप्त होण्यापासून वाचवा. मात्र जनता आणि सरकार दोघेही याबाबत उदासीन दिसतात. हिंदी तिच्याच घरात दासी म्हणून राहते. हिंदी ही अद्याप संयुक्त राष्ट्रांची भाषा बनलेली नाही. योगाला १७७ देशांचा पाठिंबा मिळाला असे म्हणणे उपरोधिक ठरेल, पण १२९ देशांमध्ये हिंदीसाठी काय जमवता येत नाही? त्याची अशी अवस्था झाली आहे की, हिंदी दिवसाच्या दिवशीही ट्विटरवर अनेकांना हिंदीत बोला असे शब्द वापरावे लागत आहेत.

शेवटी हेच सांगावसे वाटते की, हिंदीला तूच्छ लेखु नका, तीही देशातील प्रमुख व राष्ट्रभाषा आहे. हिंदीला विरोध करुन आपण काहीही साध्य करु शकत नाही. तेव्हा हिंदी राष्ट्रभाषा म्हणुन बंधनकारक करावी. हा देश माझा आहे, ही आपुलकीची भावना ठेवायला शिका. देशावरचे तुमचे प्रेम, सांमजस्य, सहकार्य, राष्ट्रपुरुषांचे पुण्यस्मरण इत्यादि तऱ्हेने प्रत्यक्षात कृतीत उतरवा व सतत राष्ट्रीय एकात्मेची भावना आपल्या मनात प्रज्वलित करा सर्वांना हिंदी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकरी - गोर गरिबांच्या मुलांना ऑनलाईन शिक्षणाची सुविधा : प्रा. शामसुंदर कुलकर्णी

लातूर : पुणे येथील अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकरी – गोर गरिबांच्या पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलांना अतिशय नाममात्र शुल्कात दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती अरणी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. शामसुंदर कुलकर्णी यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

अरणी फाउंडेशन मागच्या २५ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील लाखोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आपले उज्वल भवितव्य घडविण्याचे काम केले आहे. विद्यार्थी मोबाईलच्या माध्यमातून गुगलवर प्ले स्टोअरवर अरणी फाउंडेशन टाईप करून ऍप डाऊनलोड करून घेऊ शकतात. हे पूर्णतः मोफत आहे. सद्यस्थितीत ८० हजारांहून अधिक विद्यार्थी शालेय व स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन घेत आहेत. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यासाठी फाउंडेशनकडे अनुभवी आणि उच्चशिक्षित कर्मचारी वर्ग आहे. कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रात मोठा बदल झाला आणि ऑनलाईन शिक्षण पद्धती विकसित झाली. समाजातील शेतकरी, तळागाळातील गोरगरीब विद्यार्थ्यांनाही ऑनलाईन पद्धतीने शिक्षण अगदीच माफक शुल्कात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आपण शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना सोबत घेऊन अरणी फाउंडेशनची स्थापना केल्याचे सांगून प्रा. शामसुंदर कुलकर्णी म्हणाले की, विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले तर विद्यार्थी एमपीएससी – यूपीएससी सारख्या परीक्षेतही नेत्रदीपक यश संपादन करू शकतात.आपल्या अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून आपण अनेक आश्रम शाळांना मोफत ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देतोय. गणित , विज्ञान आणि इंग्रजी या विषयांसाठी नाममात्र प्रतितास एक रुपया एवढे अल्प शुल्क आकारतो. जे विद्यार्थी हे शुल्क देण्यास असमर्थ आहेत, त्यांना मोफत सुविधा दिली जाते. मराठी माणसाची सर्वांगीण प्रगती व्हावी. एमपीएससी – यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी यशस्वी व्हावेत,अशी आपली अपेक्षा कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रात मागच्या २७ वर्षांपासून कार्यरत असताना आपण उत्कृष्ट कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. पैसे न घेता दर्जेदार शिक्षण देऊन भावी पिढी घडवण्याचा आपला मानस आहे. आपल्या संस्थेसाठी कोणी इच्छुक सहकार्य – मदत करण्यासाठी पुढे आल्यास आपण रोख स्वरूपात मदत न स्वीकारता ती शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात स्वीकारतो. आपल्या फाउंडेशनच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ पाचशे रुपये वार्षिक शुल्क आकारले जात असल्याचेही प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले. सध्या आपल्याकडे एकूण ८० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकी ६० हजार विद्यार्थ्यांकडून एक रुपयाही शुल्काच्या रूपाने घेतला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ऑनलाईन शिक्षण मोबाईलच्या माध्यमातून दिले जाते. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर गेम खेळण्यासाठी न करता अभ्यासासाठी केल्यास



मोबाईलचे दुष्परिणाम काहीही होणार नाहीत असेही ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगर , बाणेर , पुणे या ठिकाणी संस्थेच्या वतीने उभारण्यात आलेल्या अद्यावत स्टुडिओच्या माध्यमातून हे ऑनलाईन शिक्षण देण्यात येते. राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही प्रा. शामसुंदर कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी प्रा. बाळासाहेब घुगे यांचीही उपस्थिती होती.

# लातूर शहर व ग्रामीणची जागा शिवसेना लढणार – जिल्हाप्रमुख सचिन दाने

लातूर/प्रतिनिधी: लातूर जिल्ह्यात शिवसेनेची मोठी ताकद आहे.या बळावर लातूर शहर व लातूर ग्रामीण या दोन विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्याचा निर्धार पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी दिली. लातूर शहर व ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दाने बोलत होते.ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी,विधानसभा निवडणुकांच्या तयारी साठी शिवसेना लातूर जिल्हा,लातूर शहर आणि ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपर्कप्रमुख ॲड बळवंत जाधव यांच्या उपस्थितीत आणि शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख सचिन दाने यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विश्रामगृह येथे घेण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी निवडणुकांसाठी जोमाने तयारीला लागावे.शाखा प्रमुख आणि बुथ प्रमुख ही शिवसेनेची प्रमुख यंत्रणा असून सर्व पदाधिकाऱ्यांनी नवीन शाखा स्थापना,शिवदूत, आणि नियुक्त्या करून आपल्या कार्यक्षेत्रातील जनतेचे प्रश्न सोडवावेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जनकल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोचवाव्यात. लातूर शहर आणि लातूर ग्रामीण विधानसभा या दोन्ही जागा महायुतीतून शिवसेना पक्ष



ताकदीने लढवणार आहे. जिल्ह्यात ६ विधानसभा मतदारसंघ असून महायुतीतील तीन पक्षांना प्रत्येकी दोन जागा मिळतील.त्याप्रमाणे शिवसेनेच्या हक्काच्या या दोन्ही जागा आहेत. आढावा बैठकीत अनेकांनी निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली असून या दोन्ही जागा लढवण्यासाठी शिवसैनिक तयार आहेत. पक्षश्रेष्ठी जो उमेदवार देतील,जो आदेश देतील तो शिरसावंद्य मानून सर्व शिवसैनिक आणि कार्यकर्ते ताकदीने निवडणूक लढवतील. या जागा आम्ही जिंकणारच असे दाने यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने प्रत्येक शाखा प्रमुख ते जिल्हाप्रमुख पदाधिकाऱ्याने रोज प्रत्येकाने लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी १५ कुटुंबांना भेट द्यायची आहे.बुथ प्रमुखांनी सुधारित मतदारयाद्या वाचन करून शाखेतील पदाधिकाऱ्यांनी वॉर्ड निहाय तयारी करावी. येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा शिवसेनेचेच एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावे यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी कामाला लागायचे आहे. ही निवडणूक ताकदीने लढवायची आहे.त्यासाठी लागणारी सर्व यंत्रणा पक्ष उपलब्ध करून देणार असल्याचे दाने यांनी सांगितले. लवकरच दोन्ही मतदारसंघात शिवसेनेचा भव्य मेळावा होणार असून विधानसभेवर भगवाच फडकणार असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या बैठकीस महिला जिल्हा संघटिका कल्पनाताई बावगे, उपजिल्हाप्रमुख ग्रामीण विजय जाधव,महानगर प्रमुख ऋषिकेश कदम, शहर प्रमुख ड.परवेझ पठाण,मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष प्रमुख विष्णू बेडगे,रेणापूर शहरप्रमुख रवी चव्हाण, युवासेना जिल्हाप्रमुख कुलदीप सूर्यवंशी, युवराज वंजारे, युवती जिल्हा अध्यक्ष राधिका पाटील,तालुका प्रमुख राजकुमार सूर्यवंशी , मुरुड शहर प्रमुख अंकुश नाना कुंभार, प्रकाश पाटील वांजरखेडकर, राजकुमार कलमे, बाळकृष्ण अडसूळ , विष्णू साबदे , बाबुराव शेळके, कृष्णा सरवदे, औसा तालुका प्रमुख गणेश माडजे , सर्व तालुकाप्रमुख, तालुका संघटक, उपतालुकाप्रमुख,आजी –माजी पदाधिकारी, शिवसैनिक, विविध आघाड्यांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘मुख्यमंत्री योजनादूत’ ; अर्ज करण्यास १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

मुंबई, दि. १४ : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी बटन दाबून अर्ज करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# समाज माध्यमांवर काय पहावे याचे ज्ञान असणे आवश्यक : पोलिस अधीक्षक परदेशी

मानवत/प्रतिनिधी युवकांना हव्या असणा–या प्रेरणा समाज माध्यमांवर उपलब्ध आहेत. फक्त समाज माध्यमावर काय पहावे याचे ज्ञान हवे असे मत पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी व्यक्त केले. तालुका पत्रकार संघ गणेश मंडळातर्फे येथील केकेएम महाविद्यालयाच्या स्व. पन्नालाल चांडक सभागृहात समाज माध्यमांचा वापर आणि आजची तरुणाई या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव बालकिशन चांडक होते. यावेळी कोषाध्यक्ष रामचंद्रराव कत्रुवार, प्राचार्य भास्कर मुंडे, नगर पालिकेच्या मुख्याधिकारी कोमल सावरे, पोलीस उपनिरीक्षक संदीप बोरकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय नाईक यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना श्री. परदेशी म्हणाले की, समाज माध्यमांचा वापर करताना आपण सावध असायला हवे. समाज माध्यमांचा रियल टाईममध्ये निश्चितच फायदा होतो. परंतु त्याबरोबरच फसवाफसवीही होते. त्यामुळे कोणत्याही अनोळखी नंबर वरून



आलेली लिंक ओपन करू नका असे त्यांनी आवर्जून सांगितले. पुस्तके आणि वर्तमानपत्रे वाचल्याने विद्यार्थ्यांचे अनुभव विश्व समृद्ध होते. प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मकतेने पाहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. कोणतेही क्षेत्र कमी नाही मात्र त्या क्षेत्रात आपण नेटाने आणि अभ्यासपूर्ण काम करायला पाहिजे. आपल्याला लागणा–या प्रेरणा आपल्या आजूबाजूला घडत असतात. त्याच समाज माध्यमांवरही आपल्याला ठळकपणे दिसून येतात.

त्याकडे पाहण्याची आपली नजर असली पाहिजे असे सांगत २०२२च्या एशियन गेममध्ये शितलदेवी या हात नसलेल्या मुलीने तिरंदाजी स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवल्याचे सांगितले. चंद्रपूर जिल्ह्यातील डोंगरहळदी या लहान गावाच्या सोहम उईके नावाच्या मुलाचा व्हिडिओ दाखवून त्या मुलाची विचार करण्याची पद्धती कशी वेगळी आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्याचबरोबर व्यंगचित्रकार आर के लक्ष्मण, आर के नारायण यांची पुस्तके, मीना प्रभू यांची प्रवास वर्णने वाचून आपले अनुभव विश्व समृद्ध केले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.


मुलींच्या संरक्षणासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचेही श्री.परदेशी यांनी सांगितले. मुलींना कोणतीही अडचण आल्यास शकुंतला चांदीवाले यांचा मोबाईल क्रमांकही देण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य भास्कर मुंडे, संचालन प्रा. डॉ. दुर्गेश रवंदे तर मनोगत व आभार प्रसाद जोशी यांनी केले. या कार्यक्रमास ॲड. सतीश बारहाते यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी कर्मचारी व पत्रकार संघाचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेत पार्थ चौधरी जिल्ह्यात प्रथम, सान्वी शितळे दुसरी

सेलू : शासकीय बाल चित्रकला स्पर्धा २०२४ या राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेत नूतन विद्यलाय सेलूचा पार्थ चौधरी याने चौथ्या गटात जिल्ह्यातून प्रथम तर तिस–या गटात कु. सान्वी शितळे हिने दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

शासकीय बाल चित्रकला स्पर्धा दि.१३ ऑगस्ट रोजी परभणी जिल्ह्यात विविध केंद्रावर व नियुक्त शाळेत संपन्न झाल्या होत्या. या स्पर्धे तील जिल्हास्तरीय उत्कृष्ट कलाकृतींची निवड शिक्षण विभाग जि.प.परभणी येथे दि.१२ सप्टेंबर रोजी करण्यात आली. ही निवड शिक्षणाधिकारी ( माध्य.) आशा गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उप शिक्षणाधिकारी गणराज यरमळ, शिक्षण विस्तार अधिकारी गोविंदराव मोरे, नव निर्वाचित सांखिकी अधिकारी कोकुलवार यांच्या उपस्थितीत करण्यात आली आहे. याप्रसंगी कलाध्यापक तथा मुख्याध्यापक दिलीप सोनकवडे, कलाध्यापक संघाचे विभागीय उपाध्यक्ष माधव घयाळ, परभणी जिल्हा समन्वयक तथा जिल्हाध्यक्ष केशव लगड यांनी परीक्षण करून प्रत्येक गटात १५ उत्कृष्ट कलाकृती अशा एकूण ४ गटातील ६० कलाकृती निवडल्या आहेत. या कलाकृतींना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,





मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. या यशाबद्दल पार्थ चौधरी, सान्वी शितळे यांचे संस्था पदाधिकारी आणि शाळेचे मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक आर डी कटारे, फूलसिंग गावित यांचे मार्गदर्शन लाभले.

# किचनमधील या काळ्या पदार्थातील ‘कॅप्साईसिन’ वाढवतो पुरुषांमधील स्टॅमिना, नियमित करा सेवन

काळी मिरी हा असा मसाला आहे की तो भारतातील जवळपास प्रत्येक स्वयंपाकघरात आढळतो, त्याद्वारे तुम्ही जेवणाची चव वाढवता. पण काळी मिरी कोणत्याही आयुर्वेदिक औषधापेक्षा कमी नाही, त्यात असलेले कॅप्सेसिन शरीरासाठी खूप फायदेशीर ठरते. अनेकदा काढ्यामध्येही याचा उपयोग करून घेतला जातो. केवळ खाण्यासाठीच नाही तर काळ्या मिरीचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. विशेषतः पुरूषांना स्टॅमिना राखण्यासाठीही याचा फायदा मिळतो. पोषणतज्ज्ञ निखिल वत्स यांनी सांगितले की, जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यात काळी मिरी मिसळून सेवन केले तर ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. काळी मिरी वाढवते स्टॅमिना

कोमट पाण्यासोबत काळी मिरी खाल्ल्याने शारीरिक क्षमता वाढते. तसेच शरीरातील पाण्याची कमतरता नियंत्रित राहते. विशेषतः काम करणाऱ्या पुरुषांसाठी हे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. तुम्ही सकाळी उठून काळ्या मिरीचे पाणी पिण्याने स्टॅमिना चांगला राखला जातो. मात्र त्याआधी आपल्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

पोटाचा त्रास दूर होईल पोटात गॅस होत असल्यास किंवा सिडिटी असल्यास लिंबाच्या रसामध्ये चिमूटभर काळे मीठ आणि काळी मिरी पावडर मिसळून प्याव्यात, दुखण्यापासून काही क्षणात आराम मिळेल. काळी मिरी ही अनादी काळापासून औषध म्हणूनही वापरली जाते. तर आयुर्वेदातही याचा उल्लेख आहे. त्यामुळे पोटाचा त्रास होत असल्यास काळी मिरीचा उपयोग करून घ्यावा

तणाव दूर होईल सध्या ताणतणावामध्ये दर १० पैकी ९ जणांना त्रास होताना दिसून येत आहे. तर काळ्या मिरीमध्ये पाइपरिन असते आणि त्यात नैराश्यविरोधी गुणधर्म असतात. त्यामुळे काळी मिरी तणाव आणि नैराश्य दूर करण्यात मदत करते. तुम्हीही





तणावात असाल तर काळ्या मिरीचे एखादे ड्रिंक तुम्ही सेवन करू शकता.

हिरड्या कमकुवत होणार नाहीत

काळी मिरी हिरड्या दुखण्यापासून लवकर आराम देते. काळी मिरी, माजूफळ आणि सैंधव मीठ समप्रमाणात एकत्र करून त्याची पावडर बनवा. त्यानंतर मोहरीच्या तेलाचे काही थेंब मिसळा आणि दात आणि हिरड्यांवर लावा आणि अर्ध्या तासानंतर तोंड धुवा. यामुळे तुमच्या दात आणि हिरड्यांमधील दुखण्याची समस्याही दूर होईल. हा घरगुती उपाय तुम्हाला नक्कीच फायदेशीर ठरेल.

कर्करोग टाळेल महिलांसाठी काळी मिरी खाणे खूप फायदेशीर आहे. काळ्या मिरीमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, फ्लेव्होनॉइड्स, कॅराटिन्स आणि इतर अँटीऑक्सिडंट्स असतात. ज्यामुळे स्त्रियांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. सध्या ब्रेस्ट कॅन्सरचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. हे टाळण्यासाठी तुम्ही नियमित काळ्या मिरीचा वापर करून घेऊ शकता.

सर्दीची समस्या दूर होईल याशिवाय सर्दी झाल्यास गरम दुधात काळी मिरी मिसळून प्यायल्याने आराम मिळतो. सर्दी वारंवार होत असेल किंवा सतत शिंका येत असतील, तर काळी मिरींची खाण्याची संख्या एकापासून सुरू करून पंधरापर्यंत रोज एकाने वाढवावी आणि पंधरावरून एक येईपर्यंत दररोज एक कमी करावी. अशा प्रकारे तुम्हाला थंडीच्या समस्येपासून आराम मिळेल. डिहायड्रेशनची समस्या दूर होईल डिहायड्रेशनची समस्या असल्यास कोमट पाण्यासोबत काळी मिरी खाल्ल्याने शरीरातील पाण्याची कमतरता दूर होते. यामुळे थकवाही येत नाही. यासोबतच त्वचेमध्ये कोरडेपणा येत नाही.

# धिरज देशमुख यांनी प्रामाणिकपणे विकास कामे केली, पुन्हा आशिर्वाद द्या

## सामनगाव, चिखुर्डा येथे महिला मेळावा

लातूर /प्रतिनिधी :– लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी धिरज देशमुख यांना पाच वर्षांपुर्वी भरभरुन आशिर्वाद दिले. त्यामुळे ते आमदार झाले. आमदार झाल्यानंतर धिरज देशमुख यांनी लातूर ग्रामीणचा प्रामाणिकपणे सर्वांगिण विकास केला. हा विकास मतदारांच्या आशिर्वादामुळे होऊ शकला. त्यामुळे आगामी काळातही मतदारांनी आमदार धिरज देशमुख यांच्या पाठीशी आशिर्वाद कायम ठेवावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.

लातूर तालुक्यातील सामनगाव व चिखुर्डा येथे दि. १४ संप्टेंबर रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, सुनिता अरळीकर,दैवशाला राजमाने, रविंद्र काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर तालुक्यातील सामनगाव येथे गुरूलिंग बुलबुले यांच्या निवासस्थानी बचत गटांच्या महिलांची बैठक झाली.



यावेळी झालेल्या बैठकीत बोलतांना श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या कि, गेली दहा वर्ष आपल्या पक्षाचा खाजदार नव्हता यंदा आपल्या पक्षाचा खाजदार आपन सर्वानी निवडून दिला आहेत. त्यामुळे आपल्या सर्वांचे आभार. पुरूष मंडळींच्या सभा होत असतात. पुरूष मंडळी कोटेही जाते, मात्र महिलांना कुटेही जाता ऐत नाही म्हणून आम्ही तूमच्या अडी–अडचणी जाणून घेण्यासाठी आलो आहेत. आज ज्या महिला आल्या नाहीत त्यांना तूमी सागा कॉग्रेस पक्षहा सर्व गोर–गरीब, शेतकरी यांना सोबत घेवून चालनारा पक्ष आहे. भाजप सरकारने गेल्या दहा वर्षात अनेक आश्वासन आपल्याला दिले आहेत. पहिल्या पाच वर्षात त्यांनी सागीतले कि, आम्ही बाहेर असलेला काळा पैसा भारतात आणू आणि गौर गररीब जनतेला प्रतेकि १५ लाख रूपये देवू मात्र आज पर्यंत या सरकारने एक रूपयाही दिला नाही. त्यानंतर त्यानी सागीतले कि, युवक–युवतीना वर्षाला २ काटो नोकरी देणार असल्याचे सांगीतले मात्र तेहि या सराकारने दिले नाही. त्याचबरोबर आता लाडकी बहिन योजना या सरकारने काडली आहे. मात्र ही योजना निवडणूक होई पर्यंत चालू राहणार आहे. या सरकारचे लबाड्याच अवतन आहे. त्यामुळे या सरकारच्या जाहिरातीला बळू पडू नका असे आवाहन केले.

गेल्या अनेक वर्षापासून आपन सर्वानी पाहयल आहे. कि,कॉग्रेस पक्षाने आपल्या लातूर ग्रामीनसह जिल्ह्याचा विकास केले आहे. पुढील काळातही आपला आशिर्वाद ग्रामीनचे लोकप्रिय आमदार धिरज देशमुख यांना द्यावा. या विधानसभेत महायुतीचे सरकार पडणार आहे. आणि आपले सरकार येणार आहे. आपन आपल्या कॉग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहयच आहे. आपल्या आशिर्वादामुळे लोकसभेला कॉग्रेस पक्षाचा उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना १ लाख ६२ हजार अधिक मतानी खाजदार म्हणून निवडून दिलात. तोच आशिर्वाद परत लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांना देण्याचे आवाहन केले. हे महायुतिचे सरकार खोट्या जाहीराती करीत आहे. कॉग्रेस पक्षानी केलेले काम त्यांनी केले असे खोट्या जाहीराची फलक ते लावत आहेत. त्यांच्या या खोट्या जाहीराला बळी पडू नका असे आवाहन यावेळी केले. महाविकास आघाडीचे खाजदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आपन सर्वाधिक मतानी लोकसभा निवडणूकित विजयी केला आहात त्याबद्दल धन्यावाद.. कॉँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात अनेक योजना राबल्या आहेत. मात्र त्या योजनेची खोटी जाहीरात कधीच कॉँग्रेस पक्षाने केली नाही. आपल्या पक्षाच्या योजना ही गोर–गरीब, शेतकरी, मजुर यांच्यासाठी राबवल्या जातात. त्यामुळे महाराष्ट्रात आपले हक्काचे सरकार आणायचे आहे. त्यासाठी आपले लातूर ग्रामींणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांना येणाजया विधानसभा निवडणूकीत आपला भाऊ, मुलगा निवडणूकीच्या मैदानात आहे म्हणून मोठ्या मताधीक्यानी विजयी करुन आपल्या लातूर ग्रामीणचा विकास करायची संधी पुन्हा एकदा द्यावी असे, आवाहन केले.

आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी विकास योजना गावापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला

सौ. दीपशिखा धीरज देशमुख

यावेळी रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा धीरज देशमुख म्हणाल्या, आज आपल्या गावात येऊन आपल्याशी संवाद साधून आपल्या अडी–अडचणी जाणून घेऊन आनंद वाटला. गेल्या पाच वर्षांमध्ये आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी आमदार म्हणून काम करताना जास्तीत जास्त विकास योजना गावापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला प्रत्येक गावामध्ये त्यांनी गार–गरीब, शेतकजयांसाठी विविध योजनेच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढे देखील आपल्यासाठी ते असेच काम करीत

## श्री बाल सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर



चाकूर :– चाकूर( वा ) येथील श्री बाल सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने दि.१३ सप्टेंबर रोजी बसवेश्वर चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळी ५१ तरुण दात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबीराचे उद्घाटन नायब तहसीलदार दिगंबर स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख पाहुणे पोलीस उपनिरीक्षक मुंबई वर्षा ईरवाने,राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हा सरचिटणीस संदीप शेटे,इंदिरा पाटील शाळेचे मुख्याध्यापक गोविंद चाकूरकर,तलाठी संघटनेचे अध्यक्ष अविनाश पवार यांची उपस्थित होती. चाकूर शहरातील नवसाला पावणारा व ७१ वर्षापुर्वीची परंपरा,ऐतिहासिक वारसा असलेला गणपती म्हणून बाल सार्वजनिक गणेश मंडळ पंचक्रोशीत परिचीत आहे. या मंडळाद्वारे दरवर्षी विविध सामाजिक,धार्मिक उपक्रम राबविले जातात. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून अत्यावश्यक रुग्णांना रक्ताचा पुरवठा होत नसल्यामुळे गणेश मंडळाने रक्तदान शिबीर घेतले आहे.यावेळी एकूण ५१ तरुण रक्तदात्यांनी रक्तदान केले

उद्घाटक नायब तहसिलदार श्री.स्वामी यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याबद्दल गणेश मंडळाचे कौतुक करून सर्व गणेश भक्तांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन संग्राम पाटील यांनी केले. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे मार्गदर्शक नरेंद्र आप्पा नागनाथ शेटे,अमित पाटील,गोपळ साखरे,गणेश मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश होळदांडगे,उपाध्यक्ष मनोज सूर्यवंशी,सचिव शंकर ऊजनकर,कोषाध्यक्ष सौरभ शेटे स्वागताध्यक्ष बळीराम शेटे,शैलेश होळदांडगे,आकाश पाटील,अमित होळदांडगे,रोहित कस्तुरे, सौरभ भातके आदी सदस्यांनी पुढाकार घेतला.

## गोविंद शिंदे यांना अर्जित रजा रोखीकरण व उर्वरित बोनस व्याजासह देण्याचे औद्योगिक न्यायालयाचे आदेश

लातूर :– लातूर जिल्हा महसूल कर्मचारी (वर्ग –३ व ४) सहकारी पतसंस्था मर्या. लातूरचे सेवानिवृत्त लिपीक गोविंद बाजीराव शिंदे यांना अर्जित रजा रोखीकरण व उर्वरित बोनस रक्कम देय्य तारखेपासून ६ टक्के व्याजदराने,तीन महिन्यांच्या आत देण्याचे आदेश औद्योगिक न्यायालयाचे पीठासीन अधिकारी धनाजी अ.जाधव यांनी दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी दिले आहेत.तक्रारदाराची बाजू ॲड. सुधाकर अरसुडे यांनी मांडली होती.

याबाबत अधिक महिती अशी की,गोविंद शिंदे (महमदापूर,ता.जि.लातूर) हे दि.१जुलै १९९९ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीमध्ये लातूर जिल्हा महसूल कर्मचारी (वर्ग –३ व ४) सहकारी पतसंस्था मर्या.लातूरमध्ये लिपिक म्हणून कार्यरत होते. सेवानिवृत्तीनंतरचे क्लेम भविष्य निर्वाह निधी रकमेवरील व्याज,सन २०११–१२ या वर्षाचे बोनस,वैद्यकीय रजा, शिल्लक रजेच्या रोखीकरणाचे ङ्कायदे संबंधित



पतसंस्थेने दिले नाहीत,यासाठी शिंदे यांनी पतसंस्थेकडे वारंवार देय्य लाभ देण्याची मागणी करुनही तपसंस्थेकडून कसलाही प्रतिसाद मिळाला नाही.याअनुषंगाने जिल्हा उपनिबंधक,लातूर यांनी दि.११ ङ्केब्रुवारी २०१३ रोजी दिलेल्या आदेशाचे पालनही केलेले नाही.या नाराजीने गोविंद शिंदे यांनी ऍड.सुधाकर अरसुडे यांच्या मार्ङ्कत लातूर औद्योगिक न्यायालयात युएलपी दावा क्र.२०५/२०१९ नुसार दि.१९ डिसेंबर २०१९ रोजी दाखल केला होता.

सदर दावा प्रकरणी दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी औद्योगिक कामगार न्यायालयाचे पीठासीन अधिकारी धनाजी अ.जाधव यांच्या समोर दोन्ही बाजूच्या वकीलांनी बाजू मांडली.यात पीठासीन अधिकारी धनाजी जाधव यांनी लातूर जिल्हा महसूल कर्मचारी (वर्ग –३ व ४) सहकारी पतसंस्था मर्या.लातूरने गोविंद शिंदे याना अर्जित रजा रोखीकरण व उर्वरित बोनस रक्कम देय्य तारखेपासून ६ टक्के व्याजदराने तीन महिन्यांच्या आत देण्याचे आदेश दिले.या प्रकरणी तक्रारदार गोविंद शिंदे यांच्यावतीने ऍड.सुधाकर अरसुडे यांनी तर तपसंस्थेच्यावतीने ऍड.एम.जी.सुतार यांनी काम पाहिले.

## १५ सप्टेंबर रोजी शिर्डी येथील ‘पेन्शन राज्य अधिवेशनात प्राध्यापकांनी सहभागी व्हावे– अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड

लातूर :– महाराष्ट्रातील सर्व कर्मचार्यांना ‘जुनी पेन्शन योजना’ लागू करावी या मागणीसाठी ‘महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना’ व कर्मचारी समन्वय समितीने दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी, जि. अहमदनगर येथे ‘पेन्शन राज्य अधिवेशन’ आयोजित केले आहे. या अधिवेशनात प्राध्यापकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाने १ नोव्हेंबर २००५ रोजी व नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना डीसीपीएस/ एनपीएस योजना’ सुरू केली. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारने २४ व २५ सप्टेंबर २०२४ रोजी अनुक्रमे ‘एकीकृत निवृत्तीवेतन योजना’ (ण.झ.ड.) व ‘सुधारित पेन्शन योजना’ लागू करण्याची घोषणा केली आहे. या सर्व पेन्शन योजनांचे स्वरूप बघता या योजना निव्वळ फसव्या असून त्यातून सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांना सामाजिक व आर्थिक स्थैर्य मिळणे कठीण आहे. त्यामुळे १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांना म.ना.से. अधि. १९८२ व १९८४ अंतर्गत जुनीच पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी अशी मागणी राज्यातील १७ लाख कर्मचाऱ्यांच्यावतीने सातत्याने विविध आंदोलने, मोर्चे, उपोषणे आदि माध्यमातून केली जात आहे. नवीन पेन्शन योजनेतील राज्यातील जवळपास ८ लाख २७ हजार कर्मचाऱ्यांचा सुधारित पेन्शन योजनांना विरोध असून केवळ जुनी पेन्शन योजनाच कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे हे राज्य शासनाला ठणकावून सांगण्यासाठी दि १५ सप्टेंबर २०२४ रोजी संत जनार्दन



स्वामी आश्रम शेजारी, शिर्डी जि. अहमदनगर येथे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या पुढाकारातून पेन्शन महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. राज्य पातळीवर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफुक्टो) व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत ‘एमफुक्टो’ संलग्नित ‘स्वामुक्टा’ प्राध्यापक संघटनेच्यावतीने या राज्यस्तरीय पेन्शन अधिवेशनाला जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. ‘स्वामुक्टा’चे सर्व पदाधिकारी व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने या पेन्शन अधिवेशनात सक्रीयपणे सहभागी व्हावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड, सचिव डॉ. विजय भोपाळे, कोषाध्यक्ष डॉ. दिलीप पाईकराव, उपाध्यक्ष डॉ. डी. एन. मोरे, समन्वयक डॉ.अमोल लाटे व केंद्रीय कार्यकारिणी पदाधिकारी डॉ. गोपाळ मोघे, डॉ. टी.आर.फिसफिसे, डॉ. सुनील व्हावारे, डॉ. करुणा देशमुख, प्रा. डी.आर.भुरे, डॉ. गौतम दुथडे, डॉ. सुधीर वाघ, डॉ. किशोर हुगे, डॉ.जयद्रथ जाधव, डॉ. रामचंद्र भिसे, डॉ. नानासाहेब पाटील, डॉ. काशिनाथ चव्हाण, डॉ. प्रभाकर जाधव,डॉ.संजीव अग्रवाल, डॉ. मनोजकुमार सोमवंशी, डॉ. रावसाहेब इंगळे, डॉ. बाळासाहेब गित्ते, डॉ. एस.आर. यादव यांनी केले आहे.

## रुद्राक्ष अन् राखीवरुन लागला छडा; खूनातील आरोपी जेरबंद तेलंगणातून घेतले ताब्यात : अनैतिक संबंधातून घडला प्रकार

**असा सुरु झाला तपास,पोलिस निरीक्षक देवीदास चोपडे, मांडवीचे सपोनि शेख गफार यांनी नांदेड एलसीबीच्या मदतीने तेलंगणा पोलिसांशी संपर्क साधला. मिसिंग दाखल आहे का ते शोधले, फोटो दाखवला. पण खात्री पटत नव्हती. करंगळीला दुसरे बोट असल्याचे सांगण्यात आले. मयताच्या पत्नीला बोलावून ओळख पटवण्याचा प्रयत्न केला. पण ओळख काही पटली नाही. गुप्त माहितीच्या आधारे मयताचा डावा पाय फॅक्चर असून, पायात राड असल्याचे सांगितले. रुद्राक्ष व राखी दाखवल्यानंतर मयताची ओळख पटली.**

**त्यानंतर पोलिस मुख्य आरोपी विनोद नरसिंग मारशेट्टी याच्यापर्यंत पोहचले. ११ सप्टेंबर रोजी खून करण्यासाठी मदत करणारा देवन्ना बोनगीर याला ताब्यात घेतले. हाताची राखी व बांधलेले रुद्राक्ष जळाले नसल्याने मयताची ओळख पटली व आरोपींच्या मुसक्या आवळायला पोलिसांना मदत झाली.**

किनवट/शेख शौकत :–अंबाडीच्या फुगडीगुट्टा जंगलात किनवट मांडवी राज्य मार्गालगत ७ सप्टेंबर रोजी अनोळखी पुरुषाचे अर्धवट अवस्थेत जळालेले प्रेत आढळून आले होते. पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान करत अवघ्या २४ तासात मारेकऱ्यास अटक केली. या खुनाचा गुंता प्रेताच्या हाताला बांधलेल्या रुद्राक्ष व राखीवरून सोडवला. अनैतिक संबंधातून हा खून करण्यात आल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील भीमपूर तालुक्याच्या पिंपळकोटी गावातील नारायण जानाकोंडा (३८) या मयताच्या पत्नी सोबत गावातीलच विनोद नरसिंग मारशेट्टी (४७) याचे अनैतिक संबंध होते. त्यामुळे मयत नारायण आणि त्याच्या पत्नीत वाद होत होता. मयत हा पत्नीला मारहाण करायचा आणि विनोदला पैसे मागायचा. ब्लॅकमेल नेहमीची झाल्याने नारायणचा काटा काढण्याचा बेत विनोद मारशेट्टी याने आखला. त्यासाठी त्याच गावातील देवन्ना शिवन्ना बोनगीर (४८) याची मदत घेतली. ४ सप्टेंबर रोजीच नारायण जानाकोंडा याचा काटा काढायचे ठरले. पण मयत हा घराबाहेर निघाला नाही. दुसऱ्या दिवशी ५ सप्टेंबर रोजी आदिलाबादला जायचे म्हणून मांडवी मार्गाने दारू पाजत पाजत दुचाकीवरून तिघेजण अंबाडी जंगलातील पिंपळगाव (भि.) शिवारात असलेल्या फुगडीगुट्टा जंगलात आले. तेथे मयताला दारू पाजून त्याच्या पोटात चाकूने वार केले. त्यानंतर पेट्रोल व दारू टाकून जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. शुक्रवारी गुराख्याला प्रेत दिसले; पण त्याची वाच्यता झाली नाही. ७ सप्टेंबर रोजी वनविकास महामंडळाच्या जंगलात विडिंगच्या कामांसाठी जाणाऱ्या मजूर व वन कर्मचाऱ्याला अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह दिसून आला. वन कर्मचाऱ्याने मांडवी व किनवट पोलिसांना याची माहिती दिली. पंचनामा करून उत्तरीय तपासणी केली.


## भारतीय संस्कृती जतन करण्यात हिंदी भाषा अग्रेसर – प्रा. डॉ.मनोहर चपळे

बाभळगाव : भाषा हे अभिव्यक्तीचे साधन आहे. समाजास एकसंघ ठेवण्यात भाषेची खूप मोठी भूमिका असते. हिंदी ही अनेक राज्याची दैनंदिन व्यवहाराची भाषा आहे. हिंदी ही रोजगार देणारी भाषा आहे. प्रत्येक क्षेत्रात हिंदी बोलली आणि लिहिली पाहिजे. हिंदीमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय संस्कृतीचे ज्ञान उपलब्ध आहे. त्यामुळे आपली हजारो वर्षाची संस्कृती जतन करण्यामध्ये हिंदी भाषा अग्रेसर आहे – असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील हिंदी विभाग प्रमुख प्रतिपादन प्रा. डॉ.मनोहर चपळे यांनी केले. दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे हिंदी भाषा समारोप दिवसाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चपळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. प्रारंभी हिंदी प्रमुख डॉ. रणजीत जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर कुमारी प्रणाली आयरेकर दिने सूत्रसंचलन केले. यावेळी पूजा इंगळे, काळे श्रद्धा, ऐश्वर्या भोसले, ईश्वरी, सोनम, तय्यब यांनी आपले मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाला डॉ. देशमुख मॅडम, प्रा. संतोष कल्याणकर यांची उपस्थिती होती.



## किनवट तालुक्यात बीएसएनएलची सेवा कोलमडली; ग्राहकांतून नाराजी !

किनवट/शेख शौकत :–भारत संचार निगम लिमिटेडच्या सेवेचे किनवट तालुक्यात तीनतेरा वाजले आहेत.शहरातील असो ग्रामीण भागात जर बीएसएनएलच्या ग्राहकांना सेवा मिळत नसेल तर त्यावरुनच ग्रामीण भागातील ग्राहकांच्या समस्यांचा अंदाज लागू शकतो. बीएसएनएल कार्यालयाची दुरावस्था सुधारावी लागेल. एकाच कर्मचाऱ्यावर कारभार चालू आहे. केंद्र सरकारने बीएसएनएलमध्ये अमुलाग्र बदल केल्याची वल्गना केल्यामुळे जिओ सारख्या खाजगी कम्पन्यांच्या ग्राहकांनी लाथाडून हजारो ग्राहकांनी बीएसएनएलकडे धाव घेतल्याचे पहायला मिळत आहे. बीएसएनएलच्या जिल्हा प्रशासनाने किनवट त.कडे लक्ष देऊन सुधारणा करावी अशी व्हॉईस ऑफ मिडिया किनवट पत्रकारसंघासह ग्राहकांनी मागणी केली आहे. ग्रामपंचायत पासून ते मंत्रालयापर्यंत ऑनलाईन कामकाज अनिवार्य झालेले आहे. जिवो सारख्या सरकार धार्जिन्या मोबाईल सेवा देणाऱ्या कम्पन्यांनी ग्राहकांच्या जीवावर अव्वाचे सव्वा रिचार्जवृद्धी केल्यामुळे भ्रष्टाचारी, गर्भश्रीमंत वगळता हमाल, मापारी, कष्टकरी, कामगार, मजूर, शेतमजूर, अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक, सर्वसामान्य शेतकऱ्यांसह तत्समांना आता ही परवडणारी बाब राहिली नाही, म्हणून हजारो ग्राहकांचा लोंढा बीएसएनएलकडे वळला आहे. पूर्वी उभारलेले बीएसएनएलचे मनोरे (टॉवर) नेहमीच बंदावस्थेत दिसतात. बीएसएनएल हे केंद्र सरकारचे असेल तर इत्तर कम्पन्यांच्या टॉवरची सेवा चालू असते त्यावेळी बीएसएनएलचे टॉवर बंद असतात. यामागचे कारण काय?, संबंधित यंत्रणेच्या कामकाजावर ग्राहकांचा आक्षेप



असतो फक्त नोंदवला जात नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. शहरातील व ग्रामीण भाग हा सर्वसामान्यांचा आहे. बरीच वर्षापासून ते बीएसएनएल वापरतात. कांही काळापासून ते टॉवरच धूळखात पडले आहे. किमान एंटीना लावूनतरी सेवा उपलब्ध करुन दिली तरी चालेल. परंतु ग्राहकांच्या समस्या ऐकायला किनवट कार्यालयात एकही अधिकारी हजर दिसत नाही. त्यामुळे या कार्यालयात किती जागा रिक्त आणि किती भरल्या ? हि माहिती मिळत नाही. ग्रामीण गावातील टॉवरचे तसेच हाल असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. ग्रामीण भागापर्यंत अंडरग्राऊंड केबलचे जाळे तयार केले मात्र त्याची वाताहत झाली आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे बीएसएनएलच्या तुलनेत खाजगी मोबाईल कम्पन्यांचे रिचार्जचे भाव परवडणारे नाहीत. बीएसएनएलला टाटा समुहाची जोडल्यामुळे सेवेत अमुलाग्र बदल होवून कमी दराने उत्तम सेवा मिळेल अशी व्हॉईस ऑफ मिडिया शाखा किनवटसह तमाम ग्राहकांनी अपेक्षा व्यक्त केलीय.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE